CMYK

किनगांव जट्टू येथील अवैध स्टोन क्रेशर (गिट्टी खदान) बंद करा अन्यथा आंदोलन >> पान 2

बालकांचे संरक्षण आणि शिक्षणाची गुणवत्ता हा आमचा प्राधान्यक्रम - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे >> पान 3

पेनटाकळीवाशांना अखेर २७ वर्षानंतर मिळाला न्याय; गावठाण हद्दवाढ मागण्या पूर्ण >> पान 4

## सुविचार

स्वतःवर विश्वास ठेवा,
जग तुमच्यावर विश्वास ठेवेल.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



शिवजयंती दिनी जिल्ह्यात ड्राय डे जाहीर

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 188 ■ मंगळवार, दि. 18 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# एसटी कर्मचाऱ्यांना हक्काचे पैसे काढता येईना

## महामंडळाकडून ४ महिन्यांपासून पीएफच जमा होईना

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी : राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराला उशीर होत असल्याचे अनेकदा पाहायला मिळते. कर्मचाऱ्यांना पगारही थकीत ठेवल्याचे अनेकदा दिसून आले आहे. विशेष म्हणजे गेल्याच महिन्यात एसटी महामंडळाने बस दरात १५ टक्के भाडेवाढ करत ही भाडेवढ गरजेचं असल्याचं म्हटलंय. सरकार नव्या बस घेत असून महामंडळाच्या आर्थिक स्थितीकडे लक्ष केंद्रीत करत ही भाडेवाढ महत्त्वाची असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटले होते. मात्र, तरीही एसटी महामंडळाची परिस्थिती बिकट असल्याने चक्क एसटी कर्मचाऱ्यांच्या पीएफचे पैसेच महामंडळाने गेल्या ४ महिन्यांपासून भरले नसल्याचे समोर आले आहे. ऑक्टोबर महिन्यापासून एसटी महामंडळाने पीएफचे हफ्ते भरले नसल्याने ज्या कर्मचाऱ्यांना आपल्या पीएफ खात्यातून पैसे काढायचे आहेत, त्यांना ते पैसेच काढता येईना झालेत.**



मुलीच्या लग्नासाठी, नवीन घर विकत घ्यायचे असेल किंवा नवं घर बांधायचं असल्यास पीएफचे पैसे काढता येतात. मात्र, एस.टी. कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रॉव्हीडंट फंडाच्या रकमेतून रक्कम काढायची असेल तर ती सध्या काढता येत नाही. कारण, एस.टी. महामंडळाकडे निधीचा तुटवडा असल्याने प्रॉव्हीडंट फंडासाठीचे हप्ते भरणे महामंडळाला जमलेले नाही. ऑक्टोबर महिन्यापासून हे हप्ते थकीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महामंडळाला मिळणारा निधी हा कर्मचाऱ्यांच्या मासिक पगारावर खर्च करावा लागतोय, असे एसटी महामंडळाचे अधिकारी सांगतात.

सध्या तोट्यात असलेल्या महामंडळाला एसटी कर्मचाऱ्यांच्या पीएफमधील रक्कम भरण्यासाठी राज्य सरकारकडून निधीची अपेक्षा आहे. मात्र, अद्याप तरी राज्य सरकारने निधी दिलेला नाही. विशेष म्हणजे जे कर्मचारी सेवानिवृत होत आहेत, त्यांचा फंड मात्र एक महिन्याच्या आत दिला जात आहे. परंतु, जे कार्यरत असलेले कर्मचारी आहेत, त्यांना विविध कारणांसाठी आपल्या फंडातील रक्कम काढायची असल्यास त्यांना वेट अँड वॉच अशी भूमिका महामंडळाचे आहे. त्यामुळे, एसटीच्या कर्मचाऱ्यांना आर्थिक तंगी सहन करावी लागत आहे. आमच्या मागण्यांकडे शासन किंवा महामंडळातील अधिकारी लक्ष देतील का, असा सवाल यानिमित्ताने एसटी कर्मचाऱ्यांनी विचारला आहे. दरम्यान, एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांच्या पीएफ हप्त्यासाठी महिन्याला ४८० ते ४९० कोटी रुपयांच्या निधीची गरज असते.

### गिरीष देशमुख यांची चौकशी करा - गुणरत्न सदावर्ते

हे अत्यंत वेदनादायी आहे, कष्टकरी-कामगारांच्या पीएफच्या हफ्त्याचे पैसे पाठवले



जात नाहीत, हे भरत गोगावले अध्यक्ष असल्यापासून सुरू झालं आहे. तसेच, सध्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनाही याबाबत १ आठवड्यांपूर्वीच माहिती दिली आहे. गिरीष देशमुख नावाचे अधिकारी आहेत, जे दुसऱ्या कामासाठी कामगारांच्या हक्काच्या पैशाचा वापर करण्यासाठी देत आहेत. त्यामुळे, गिरीष देशमुख यांची चौकशी झाली पाहिजे, असे कामगार संघटनेचे नेते एड. गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले आहे.

## जालन्यात अवैधरित्या सुगंधित तंबाखू विकणाऱ्या दोन दुकानांवर पोलिसांचा छापा



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात अवैधरित्या सुगंधित तंबाखू विकणाऱ्या दोन दुकानांवर पोलिसांनी छापा मारलाय. जालन्याच्या चंदनझिरा पोलिसांनी ही कारवाई केली असून, या कारवाईत ५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जालना शहरातील नवीन मोंढा भागातील खेरुडकर कंपनी ट्रेडर्स आणि रॉयल ट्रेडर्स या २ दुकानांमध्ये अवैधरित्या सुगंधित तंबाखू विक्री होत असल्याची माहिती चंदनझिरा पोलिसांना मिळाली होती. त्या माहिती वरून पोलीस पथकाने नवीन मोंढा येथील दुकानांवर छापा मारून ५ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## दिग्रस येथून हैदराबादला जाणारा ट्रक पलटी, सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** दिग्रस इथून शेतकऱ्यांचा मोसंबी घेऊन जाणारा ट्रक हदगाव ते भोकर मार्ग हैदराबाद जात असताना हदगाव येथून जवळच असलेल्या हडसणी गावानजीक असलेल्या वळण रस्त्यावर ट्रक पलटी झाला. ट्रकच्या समोर अचानक रानडुकरांचा कळप आला आणि चालक रानडुकरांना वाचवण्याचा प्रयत्न करत असतानाच गाडीवरील ताबा सुटला आणि ट्रक रस्त्याच्या बाजूला पलटी झाला. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु शेतकऱ्यांच्या गाडीचे आणि मालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## बुधवारचे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा रूग्णालयात नियमितपणे बुधवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र बुधवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शासकीय सुट्टी असल्यामुळे शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

## शिवजयंती साजरी करण्यासाठी बाँडची मागणी, बीडमधील धक्कादायक प्रकार

**बीड/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे आराध्यदैवत समजले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा उत्साह सध्या राज्यासह देश-विदेशातही दिसून येत आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर, दुसरीकडे शिवजयंती साजरी करण्यासाठी बाँड पेपरवर हमी लिहून देण्याची मागणी करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील एका गावातील सरपंच आणि ग्रामसेवकांनी या बाँडची मागणी केली आहे. शिवजयंतीचा उत्साह सगळीकडे दिसून येत आहे. शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, बीड जिल्ह्यात धक्कादायक मागणी करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी म हाराजांची जयंती साजरी करायची असेल, तर बॉण्ड वर लिहून द्या अशी मागणी पाटोदा तालुक्यातील चुंबळी गावच्या सरपंच डॉ. रेशमा पोळ, ग्रामसेवक परमेश्वर सावंत यांनी जयंती समितीकडे केली आहे.

## छावा चित्रपट महाराष्ट्रात टॅक्स फ्री करा

### युवासेनेकडून उपमुख्यमंत्री डॉ.एकनाथराव शिंदे यांना निवेदन




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपट देशभरात धुमाकुळ घालत आहे.पहिल्यांदाच संभाजी महाराजावंर एवढ्या मोठ्या बजेटचा चित्रपट तयार केला आहे.प्रेक्षकांनी आपली पसंती मोठ्या प्रमाणात या चित्रपटाला दिली आहे आणि अभिनेता विकी कौशल याच्या अभिनयाला देखील दाद देत त्याचं कौतुक केलं आहे.

दरम्यान, हा चित्रपट महाराष्ट्रात टॅक्स फ्री व्हावा, अशी मागणी आता युवासेनेकडून करण्यात आली आहे. या संबंधी युवासेना ठाणे लोकसभेचे उपाध्यक्ष यज्ञेश भोईर,तसेच कोपरी पाचपाखाडी विधानसभा अध्यक्ष युवासेना ऋषिकेश माने,युवासेना कोपरी पाचपाखाडी विधानसभा उप समन्वयक रोमांच कोठावळे, विधानसभा समन्वयक प्रतिक गाढवे, विधानसभा समन्वयक संदीप राऊत यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत त्यांना निवेदन देखील दिले आहे.

यावेळी त्यांच्यासोबत युवा सेनेचे पदाधिकारी विनोद अवताडे, मृणाल रेपाळे, सुशांत मोरे, धीरज पाटील, सुशांत शेलार,रुपेश मिश्रा, तुषार अवले,विकास मोरे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवजयंती निमित्त शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी साकारली छत्रपती शिवाजी महाराजांची ४० फुटांची रांगोळी



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या निमित्ताने कल्याण मधील वेद आर्ट अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांसोबत मिळून ४० चौरस फूट आकाराची भव्य व आकर्षक रांगोळी साकारली. खडकपाडा येथील रॉक माउंट बिल्डिंग येथे ही भव्य रांगोळी साकारण्यात आली आहे. शिक्षक विद्यार्थ्यांनी तब्बल चार ते पाच तास मेहनत घेऊन ही कलाकृती पूर्ण केली.

अन् आमदार रमले शंकर पटाच्या शर्यतीत >> पान २

# वरोऱ्यात आजपासून खासदार चषक अखिल भारतीय व्हॉलीबॉल स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ


■ मनोज गोरे

**चंद्रपूर : वरोरा स्पोर्टस फाउंडेशन वरोरा (WSF ) व लोकशिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित लोकमान्य महाविद्यालयाच्या मैदानावर संपन्न होणाऱ्या स्व. खा बाळूभाऊ धानोरकर स्मृतिप्रत्यर्थ खासदार चषक अखिल भारतीय व्हॉलीबॉल स्पर्धे चे उद्घाटन मंगळवार दिनांक १८ ला महाराष्ट्र राज्याचे माजी क्रीडा मंत्री सुनील केदार यांचे हस्ते संपन्न होणार असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रतिभा बाळूभाऊ धानोरकर, खासदार चंद्रपूर वणी लोकसभा क्षेत्र या असणार आहे.**

स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार शामकुमार बर्वे,चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, वरोरा चे उपविभागीय अधिकारी झेनित चंद्रा, उपविभागीय पोलीस अधिकारी नवोमी साटम, तहसीलदार योगेश कोटकर, मुख्याधिकारी आशिष बोबडे, सवर्ग विकास अधिकारी गजानन मुंडकर. वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रफुल खुजे,जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, तर प्रमुख उपस्थिती म्हणून सर्वाधिकारी गुरुदेव सेवा मंडळ मोझरी.लक्ष्मण गमे, माजी नगराध्यक्ष. अहेतेश्याम अली, अध्यक्ष भारत शिक्षण संस्था निरज गोठी, सदस्य लोकशिक्षण संस्था वरोडा सुवर्णरेखा पाटील, अभय टोंगे, ॲड. गजानन बोडाले, बंडूजी देऊळकर, गणेश पावडे,डॉ. जयश्री शास्त्री, सुनीता काकडे हे उपस्थित राहणार असून या




स्पर्धेत भारतातील नामवंत पुरुषाचे संघ सहभागी होत आहे. इंडियन नेव्ही, साउथ सेंट्रल रेल्वे, सिकंदराबाद,नॉर्दन रेल्वे दिल्ली, एसआरएम युनिव्हर्सिटी चेन्नई, अग्नी फ्रेंड्स क्लब चेन्नई, डेंजर बॉईज तामिळनाडू, बीएसएफ जालंधर,एलएनआयपी युनिव्हर्सिटी ग्वाल्हेर सहित महाराष्ट्रातील नामवंत संघ सहभागी होत असून महिला विभागात



साउथ सेंट्रल सिकंदराबाद, सेंट्रल रेल्वे मुंबई,केरला पोलीस, पूर्व रेल्वे कोलकत्ता, एसआरएम युनिव्हर्सिटी चेन्नई, स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ इंडिया त्रिवेंद्रम, महाराष्ट्र बँक पुणे हे संघ सहभागी होणार असून यानिमित्ताने वरोरा शहरातील व्हॉलीबॉल प्रेमींना अनेक आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय खेळाडूंचा खेळ बघावयास मिळायची नामी संधी असून खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या पुढाकाराने होणाऱ्या या स्पर्धा यशस्वी करण्याकरिता आयोजन समितीचे अध्यक्ष मानस धानोरकर, लोकशिक्षण संस्था वरोडा व वरोरा स्पोर्टस फाउंडेशन वरोरा यांचे पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहे.

CMYK

## वादाशिवाय साहित्य संमेलन व्हावे!

९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी दिल्ली येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखिका तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला देशाची राजधानी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यावेळच्या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट म्हणजे या साहित्य संमेलनाचे उदघाटन देशाच्या पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २१ फेब्रुवारी रोजी ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उदघाटन करणार असून यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपस्थित राहणार आहे. हे संमेलन दिल्लीतील ताल कटोरा स्टेडियमवर होणार असले तरी उदघाटन सोहळा मात्र दिल्लीतील विज्ञान भवनात होणार आहे. या साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार हे असून या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून मराठी माणूस या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्र्वास आयोजकांना आहे. दिल्लीत होणाऱ्या हे साहित्य संमेलन दिल्लीत राहणाऱ्या मराठी भाषिकांसाठी तर पर्वणीच ठरणार आहे. दिल्लीत बहुसंख्य मराठी भाषिक आहेत ते साहित्य संमेलनाला हजर राहणार यात शंका नाही त्यामुळेच दिल्लीत होणारे हे साहित्य संमेलन ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही. या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षा तारा भवाळकर यांच्या भाषणाकडे साहित्य वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वर्षापासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे. साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात. साहित्य रसिकही साहित्यिकांचे विचार विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो. माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो. त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा. आजचे तरुण सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात. तरुण वर्गाला साहित्य संमेलनामध्ये आकर्षित करायचे असेल आयोजकांनी साहित्य संमेलनाला समाज माध्यमांशी जोडावे. आयोजकांनी साहित्य संमेलनाचे सर्व अपडेट फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर या सारख्या समाज माध्यमांवर द्यावीत म्हणजे तरुणाईत देखील साहित्य संमेलन लोकप्रिय होईल. देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत होत असलेल्या हे ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकप्रिय होऊन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल ही अपेक्षा . ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

# किनगांव जट्टू येथील अवैध स्टोन क्रेशर (गिट्टी खदान) बंद करा अन्यथा आंदोलन

## भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंडे



**लोणार :** तालूक्यातील किनगांव जट्टू येथील गट नं. २८६ मधील स्ट्रोन क्रेशर (गिट्टी खदान) पलसिध्द कंस्ट्रक्शन कंपनीची अंदाजे २० वर्षापासून सुरू असलेले अवैध स्टोन क्रेशर तत्काळ बंद करा, अन्यथा अंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात नमूद आहे की, सदर अवैध क्रशरच्या माध्यमातून करोडो ब्रास मुरुम व गिट्टी विकत असून शासनाचा लाखो करोडो रुपयाचा महसूल बुडाला आहे. गट नं.२८६ मध्ये १०० फुट अवैध पणे बोअर ब्लास्टींग करतात. आजुबाजूला लोकवस्ती असून सदर ब्लास्टिंगमुळे त्याच्या घराला तडे गेले आहेत.त्या गटामध्ये जनावरांची व शेतकऱ्यांची तहान भागविण्यासाठी तलाव आहे. या तलावाला देखील बोअर ब्लास्टींगमुळे धोका निर्माण झाला असून त्यामुळे जिवीत हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच क्रेशर मशीन, गिट्टी खदान ही किनगांव जट्टु बिबी लोणार पालखी रोडच्या लागून असून त्या डांबरी रस्त्याने शेकडो वाहने धावतात, क्रेशर मशीन मधून मोठया प्रमाणावर धुळ उडते व मोटार सायकल सह अनेक वाहन धारकांच्या डोळयात जाऊन अनेक अपघात घडले असून लागूनच गांव वस्ती, लहान मुलांची शाळा आहे त्यामुळे लहान मुलांना व वाहन धारकांना या धुळीमुळे श्र्वसनाचा व डोळ्याचा आजार उद्भवत आहे व वस्तीत नागरिकांना देखील मोठ्या प्रमाणात धुळीचा व डांबर मशीन मधून निघणाऱ्या धुराचा मोठया प्रमाणात त्रास होत आहे.

सदर खदानाचे मोठ्या प्रमाणात नियमबाहय खूप खोलवर १०० फुट बोअर ब्लास्टींग करुन खदानी तयार केल्या असून सदर खदानाचे मोजमाप भुमी अभिलेख,खनीकर्म अधिकारी किंवा अभियंता यांचे मार्फत करण्यात येऊन अवैध खदानीचे उत्खनाची दंडात्मक वसूली करण्यात यावी व क्रेशर मशीन तात्काळ बंद करण्यात यावी. तसेच ठेकेदाराचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत हितसंबंध असून या ठिकाणी मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असून स्थानिक महसूलचे कर्मचारी व अधिकारी मालामाल होत असून सदर पलसिध्द कंस्ट्रक्शन ला हे महसूल चे कर्मचारी पाठीशी घालत आहेत.

तसेच पलसिध्द कंस्ट्रक्शन कंपनीने जी.एस.टी सी.एस. टी लाखो करोडो रुपयाचा कर बुडवला असून त्यामधून शासनाचा लाखो करोडो महसूल बुडवला आहे. या खदानीसाठी पर्यावरण खात्याचा परवाना आहे का नसेल तर पर्यावरण खात्याने कार्यवाही करावी. ज्या ठिकाणहून उत्खनन होते त्या ठिकाणी खदान जोपर्यंत बंद होत नाही तोपर्यंत पावती तपासणी साठी तपासणी पथकाची नेमणूक करण्यात यावी. हा गंभीर प्रकार दिवसा ढवळया संबंधित विभागाच्या नाकावर टिचून नियम धाब्यावर बसवून काटे यांचे पलसिध्द कंस्ट्रक्शन करत आहेत. याबाबत संबंधित विभागाने दंडात्मक कार्यवाही करुन स्टोन क्रेशन, गिट्टी खदान, डांबर प्लांट २० फेब्रुवारी पर्यंत बंद करावे. अन्यथा मंत्रालय मुंबई परिसर किंवा जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा या ठिकाणी आंदोलन किंवा आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी निवेदनात दिला आहे. जिल्हाधिकारी काय कारवाई करतात याकडे तालुक्याचे लक्ष लागून आहे.

# ना वन्य प्राण्यानचा त्रास, ना जास्त खर्च, चियाची शेती फायदेशीर

दैनिक आपला विदर्भ





चिया हे पीक गहू आणि हरभरा पिकाचे खर्च लक्षात घेता चिया हे पीक हे पीक शेतकऱ्यांना फायदेशीर ठरेल शिवाय मार्केट याला भाव ही चांगला मिळतोय

**–शुभम दिलीपराव लहाने**
**चिया उत्पादक शेतकरी (करंजी)**

**शिरपूर जैन/प्रतिनिधी :** रब्बी हंगामातील गहू आणि हरभरा या पिकांना पर्याय म्हणून शिरपूर परिसरातील शेतकरी आता चिया पिकाकडे वळू लागले आहेत. पानावर केस असल्याने वन्यप्राण्यांचा या पिकाला धोका नसतो. या पिकाने यंदा शेतकऱ्यांना चांगलीच भुरळ घातली यंदाच्या हंगामात प्रत्येक तालुक्यातील शेतकऱ्यांनी हा प्रयोग केल्याचे स्पष्ट होत आहे.

चिया पिकाला सुपर फूड मानले जाते. हे प्रामुख्याने फुलांचे रोप आहे. चिया बियाणे हे पीक मूळचे मध्य आणि दक्षिण मेक्सिको व ग्वाटेमाला येथील आहे. गेल्या काही वर्षापासून चिया पिकाची लागवड भारतात होत आहे. मध्य प्रदेशातील मंदसौर आणि नीमच जिल्ह्यासह इतर काही भागांत शेतकरी त्याची लागवड करतात. हळूहळू त्याचा विस्तार इतर राज्यांतही होत असून, आता वाशिम जिल्ह्यातील शेतकरीही या पिकाकडे वळू लागले आहेत. अधिक नफा आणि कमी खर्चामुळे चिया बियाणांची लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. चियाचे पीक ११० ते ११५ दिवसांत तयार होते. चिया बियाणे लागवडीसाठी सिंचनाची विशेष गरज नसते. पाण्याचा चांगला निचरा असलेली जमीन चिया बियाण्यांच्या लागवडीसाठी अधिक चांगली मानली जाते. तसेच चिया लागवडीतून एक एकरात सरासरी ४ ते ५ प्रति क्विटल उत्पादन घेता येते, असे शेती करणारे शेतकरी सांगतात. चियाचे पीक कमी खर्चात अधिक उत्पन्न देणारे आहे. आणि चिया पिकांमध्ये औषधी गुणधर्म ही सापडतात व कृषी विभागाच्या जनजागृती मुळे या पिकाची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली आहे शिवाय वन्यप्राण्यांचाही धोका नसतो. व पिक कुठल्याही प्रकार च्या रोगाला वा किडीला बळी पडत नाही.

## समृद्धीवर मृत्यूतांडव! खासगी बसचा भीषण अपघात, एकाचा मृत्यू तर २३ जण जखमी

**अकोला/प्रतिनिधी :** स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. वाशीम जिल्ह्यात सोमवारी पहाटे ५ वाजता खासगी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून २३ जण जखमी झाले आहेत. समृद्धीवर सातत्यपूर्ण अपघात घडत असल्याने महामार्गाच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह लागले आहे.

पुण्यावरून नागपूरकडे जात असलेले राजलक्ष्मी ट्रॅव्हलच्या खासगी बसवरचे (क्र.एम.एच.१२ एच.जी. ६६६७) चालकाचे नियंत्रण गेले. त्यामुळे समृद्धी महामार्गावर चॅनेल क्र. २१५ वर नागपूर लेनवर वनोजा टोल प्लाझा पासून मालेगावकडे अंदाजे ५ किमीवर अपघात झाला. चालकाला झोपेची डुलकी आल्याने अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातात एक जण ठार झाला असून, पाच ते सहा गंभीर जखमी झाले आहेत. १७ जण किरकोळ जखमी असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान, अपघातामधील जखमी प्रवाशांना उपचारासाठी कारंजा आणि अकोला येथे रवाना करण्यात आले आहे. आमदार श्याम खोडे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घगे, मंगरूळपीरच्या तहसीलदार शीतल बंडगर, ठाणेदार सुधाकर आडे आदींनी घटनास्थळी धाव घेतली. शेलुबाजार येथील सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग कोठाळे, साई मंदिर येथे सकाळी व्यायाम करणारे नागरिक यांच्यासह वनोजा येथील नागरिकांनी अपघातातील जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले.

समृद्धी महामार्गावर वाशीम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील चॅनल १८४ जवळ ट्रक चालकाला झोपेची डुलकी लागल्याने झालेल्या अपघातात चालक आणि क्लिनरचा मृत्यू झाला. हा अपघात रविवारी घडला. गजानन छोटू हिरवाणी (वय ४६, रा. सीतासावंगी, गोबरवाही, भंडारा) व आम्हीपाल महेश कुमार (४०, रा. नागपूर), अशी मृतांची नावे आहेत. नागपूरहून संभाजीनगरकडे जात असताना ट्रकचालकाला झोपेची डुलकी लागली, त्यामुळे ट्रकने पुढील ट्रकला मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चालक आणि क्लिनरचा मृत्यू झाला.

# अन् आमदार रमले शंकर पटाच्या शर्यतीत

## आमदार सिद्धार्थ खरात यांनी घेतला धुरकरी होण्याचा आनंद

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** येथून जवळच असलेल्या नागापूर येथे भव्य शंकर पटाच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी नवनिर्वाचित खासदार यांनी या शंकरपटाच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावून शेतकऱ्यांचा तसेच शंकर पट शौकिनांचा आनंद द्विगुणीत केला. त्याचबरोबर कृषी व कृषीशी निगडित असलेल्या खेळाचा मनमुरात आनंद घेतला.एवढेच नव्हे तर, आमदाराने स्वतः धुरकधी होत रिंगीचा पल्लाही काढला. त्यामुळे आमदाराची झाला धुरकरी अशी चर्चा परिसरात रंगली. तर, आमदारांनी मला शेती व कृषी व कृषीशी निगडित सण उत्सव परंपरा आवडतात आणि त्यामध्ये मी आवर्जून सहभागी होतो आणि त्याचा आनंद घेतो, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

डोणगाव येथून जवळच असलेल्या नागापूर येथे भव्य शंकर पटाचे आयोजन करण्यात आले होते. या शंकरपटामध्ये एकापेक्षा एक वरचढ बैल जोड्या शर्यतीत उतरल्या होता. तर, या कार्यक्रमाला आमदार सिद्धार्थ खरात यांनी उपस्थिती लावून शेतकरी, नागापूर येथील ग्रामस्थ व शंकरपटात सहभागी झालेल्या हजारो शंकरपट शौकिनांचा आनंद द्विगुणीत केला. त्याचबरोबर शंकर पटातील शर्यतीत उतरलेल्या बैल जोडीचा पळण्याचा थरारकही आपल्या डोळ्यांनी अनुभवला. काही सेकंदात आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी शर्यतीतील बैलजोडी व रेंगी चालवणारे धुरकरी यांच्या धाडसाचे कौतुक केले. त्याच बरोबर हा चित्तथरारक खेळ थोडा आपणही खेळून पाहू असे म्हणत त्यांनी चक्क रेंगेवर बसून धुरकरी होत शंकरपटामध्ये पल्ला काढला. यावेळी उपस्थित शेतकरी, शंकर पट शौकीन त्याचबरोबर शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी एकच जल्लोष करत आमदार सिद्धार्थ खरात धुरकरी झाल्याचे पाहून कौतुक केले.



यावेळी सिद्धार्थ खरात यनी काही क्षणात पल्ला पार करण्यासाठी घेत असलेल्या अत्यंत परिश्रमाबद्दल शेतकऱ्यांचे शंकर पट शौकिनचे कौतुक केले. त्याचबरोबर अत्यंत चपळाईने काही सेकंदात पल्ला गाठणाऱ्या बैलांचा व त्यांना शिक्षण देणाऱ्या शंकर पट शौकिनांचे कौतुक केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# बालकांचे संरक्षण आणि शिक्षणाची गुणवत्ता हा आमचा प्राधान्यक्रम - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

## सायबर सुरक्षेच्या अनुषंगाने पालक व शिक्षकांनी सतर्क राहावे - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या 'बालरक्षा अभियान'चा उद्घाटन सोहळा संपन्न

दैनिक आपला विदभ

■ उदय नरे

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने आयोजित 'बालरक्षा अभियान'चा उद्घाटन सोहळा १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रमुख उपस्थित राहून विशेष मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा यांच्या प्रास्ताविकाने झाली, ज्यामध्ये त्यांनी 'स्कूल गाईडलाईन आणि सायबर क्राईम' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी 'बालरक्षा अभियान प्रशिक्षण पुस्तिका' आणि नूतनीकरण केलेल्या 'बालस्नेही चिराग प' चे उद्घाटन करण्यात आले. तसेच, बालहक्क जागरूकतेसाठी तयार करण्यात आलेल्या जनजागृतीपर पोस्टरचे अनावरण करण्यात आले.



यावेळी बोलताना शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, बालकांच्या सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये प्रभावी उपाययोजना राबविणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सरकार शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी कटिबद्ध असून, शिक्षण क्षेत्रातील काही समित्या पुनर्रचित करण्यात येणार आहेत. शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात सुरक्षिततेसाठी आवश्यकतेनुसार दामिनी पथक व पोलीस बंदोबस्त ठेवण्याचाही विचार आहे.

विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सायबर सुरक्षेच्या वाढत्या समस्यांकडे लक्ष वेधले. त्या म्हणाल्या, आजच्या डिजिटल युगात बालकांना सुरक्षित ठेवण्यासाठी पालक आणि शिक्षकांनी विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. त्यांना कोणत्या वेबसाईट्सवर प्रवेश असावा यावरही चर्चा होणे आवश्यक आहे. तसेच, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टमच्या माध्यमातून शाळा आणि प्रशासन यांच्यात समन्वय साधण्याची गरज आहे.

या अभियानाच्या माध्यमातून बालकांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे, शाळांमध्ये योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे आणि प्रशासनाच्या मदतीने बालहक्क संरक्षणाच्या उपाययोजना राबविणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

त्याचबरोबर सामाजिक संस्था शिक्षक आणि मुख्याध्यापक यांचे प्रतिनिधी, कोकण विभाग शिक्षक आमदार श्री. ज्ञानेश्र्वर म्हात्रे, आयोग सदस्य ॲड. जयश्री पालवे, सायली पालखेडकर, प्रज्ञा खोसरे, चैतन्य पुरंदरे आणि शिवसेना महिला विभाग प्रमुख शितल बित्रा हे सर्व प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य ॲड. संजय सेंगर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## संक्षिप्त...

### सिडकोत भर दिवसा ज्वेलर्स दुकानावर दरोडा, लाखो रुपयांचे सोनं लुटल्याने एकच खळबळ





दैनिक आपला विदर्भ

**ईगतपुरी/प्रतिनिधी :** नाशिकच्या सिडकोतील माऊली लॉन्स महालक्ष्मी नगर या ठिकाणी श्री या ज्वेलर्स या दुकानावर भर दुपारी एक ते दीड वाजेच्या सुमारास दरोडा पडल्याची घटना घडली आहे. सविस्तर माहिती अशी की, श्री ज्वेलर्स या दुकानाचे मालक घोडके व त्यांची पत्नी हे दुकानात बसलेले असताना दोन अज्ञात इसम तोंडाला रुमाल बांधून आले व त्यांनी घोडके यांना बंदुकीचा धाक दाखवत लाखो रुपयांचा सोन्याचा ऐवज लुटून पसार झाले. भर दिवसा रहदारीच्या ठिकाणी दरोडा पडल्याने सिडको परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनास्थळी सहाय्यक पोलीस घटना समजतात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह संपूर्ण पोलिस यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. भर दिवसा दरोडा पडल्याने परिसरातील व्यापारी आणि नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. या दिवसात झालेल्या लुटीवर आता पोलीस काय कारवाई करतात? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### शिवाजी महाराजांच्या फोटोचा आणि ध्वजाचा अवमान करणाऱ्या ग्रामसेवकांना निलंबित करा, स्वराज्य संघटनेकडून निषेध



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** नांदेड शहरातील जवळच असलेल्या वाडी पुयड येथे ग्रामसेवक यांनी अनेक वर्षापासून गायरान जमिनीवरती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची नियोजित जागा असताना त्या जागी छत्रपती शिवाजी महाराज यांचे फोटो व तसेच भगवे ध्वज लावण्यात आले होते. पण ते ध्वज आणि फोटो ग्रामसेवक यांनी रात्री उशिरा काढल्याने तणाव निर्माण झाला होता. त्वरित त्या ठिकाणी ध्वज व फोटो लावण्यात यावा व ग्रामसेवक यांना निलंबित करावे, यासाठी स्वराज्य पक्षाच्या वतीने जिल्हा अधिकारी कार्यालय परिसरामध्ये निदर्शने करण्यात आली असून, या संबंधित सर्व प्रशासनाला नागरिकांमार्फत निवेदन देखील देण्यात आले आ.हे आमच्या मागण्या मान्य न झाल्यास यापुढे तीव्र स्वरूपाचा आंदोलन करण्याचा इशारा स्वराज्य पक्षच्या वतीने देण्यात आला आहे.

### विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पाणीपुरवठा योजनेचा घेतला आढावा



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** संभाजीनगर जिल्हा परिषद अंतर्गत जिल्ह्यात सुरू असलेल्या पाणी पुरवठा विकास योजनांची माहिती घेण्यासाठी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज आढावा बैठक घेतली. जिल्ह्यातील गावात पाणी पुरवठा मिळावा यासाठी आलेल्या निधीची माहिती दानवे यांनी घेतली. तसेच या योजनांची वस्तुस्थिती आणि वास्तवस्थिती अंबादास दानवे यांनी यावेळी जाणून घेतली. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विकास मीना व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.



## शिवचरित्र पारायणाची सुरुवात, पोलीस आयुक्त प्रविण पवार यांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शिवचरित्र पारायण सप्ताहाचा आजचा पाचवा दिवस. छत्रपती शिवचरित्रातील शिवरायांचे बालपण, स्वराज्याचे कार्य आपले कर्तव्य, युद्ध निती या सर्वांचे सादरीकरण करण्यात आले होते. यावेळी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी शुभेच्छा दिल्या.

ते म्हणाले की, छत्रपती शिवचरित्र पारायण समितीच्या वतीने एक आगळावेगळा महाराष्ट्रात नव्हे देशात असा कार्यक्रम घेतला जात आहे. असा स्तुत्य उपक्रम शिवजयंतीनिमित्त हिंदू, मुस्लिम, सिख ईसाई स्वराज्य के शूर सिपाही, या घोषणेसह समाजामध्ये समता निर्माण करण्याचं तसेच भाईचारा निर्माण करणे, एकमेकांच्या धर्माचा आदर करणे, हीच शिकवण छत्रपतींच्या काळात होती. त्याचा प्रत्यय आज मला या शिवचरित्र पारायण स्थळी आला. त्याबद्दल मी शिवचरित्र पारायण समितीचे आयोजक प्राध्यापक चंद्रकांत भराट व त्यांचे सर्व सहकारी यांना मनापासून धन्यवाद देतो व छत्रपती संभाजी नगर सारख्या शहरामध्ये हा प्रयोग स्तुत्य आहे, तो पूर्ण महाराष्ट्रभर झाला पाहिजे याबद्दल समितीला शुभेच्छा दितो, अशी भावना यावेळी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी व्यक्त केली.

## सौर कृषी पंप योजनेकडे शेतकऱ्यांचा वाढता कल; १५३० शेतकऱ्यांनी घेतला योजनेचा लाभ



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्याला अतिरिक्त विज बिलाच्या जाचापासून सुटका मिळावी, शेतकऱ्यांना दिवसा आपल्या पिकांना पाणी देता यावे, यासाठी राज्य सरकारकडून मागील त्याला सौर कृषी पंप योजना राबविण्यात येत आहे. या योजनेकडे बुलढाणा जिल्ह्यात शेतकऱ्यांचा वाढता कल पहायला मिळतोय. जिल्ह्यातील १५३० शेतकऱ्यांनी या सौर कृषी पंप योजनेचा लाभ घेतला आहे. विजेची वाढती मागणी लक्षात घेता शेतकऱ्यांना भारनियमनाचा मोठा सामना करावा लागतोय. त्यामुळे रात्री जीव धोक्यात घालून शेतकऱ्यांना आपल्या पिकांना पाणी द्यावे लागत होते. मात्र, आता वीजबिलापासूनही शेतकऱ्यांची सुटका झाली आहे, शिवाय शेतकरी दिवसा आपल्या पिकांना पाणी देत आहेत. तर या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडी देण्यात येत असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरण कडून करण्यात येत आहे.



## बुलढाणा नगरपरिषद क्षेत्रात 'नक्शा' पथदर्शी कार्यक्रम; आज उद्घाटन होणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या डिजिटल इंडिया लँड रेकॉर्डस मॉडर्नायझेशन प्रोग्राम अंतर्गत भारतीय सर्वेक्षण संस्थेच्या मदतीने देशातील सुमारे १०० शहरांमध्ये भूमि अभिलेख तयार करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर 'नक्शा' हा कार्यक्रम राबविला जाणार आहे. याअंतर्गत राज्यातील १० स्थानिक स्वराज्य संस्थापैकी बुलढाणा नगरपरिषद क्षेत्रात नगर भूमापनाकरिता 'नक्शा' हा पथदर्शी कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे मंगळवारी दि. १८ फेब्रुवारी रोजी प्रातिनिधीक स्वरूपात केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय व भूमि संसाधन मंत्री शिवराजसिंह चव्हाण, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या उपस्थितीत ऑनलाईन उद्घाटन होणार आहे. राज्यातील नगरपरिषद क्षेत्रातील जमिनीचे जीआयएस आधारित सर्वेक्षण व भूमापन करण्याबाबतचा गावठाण जमाबंदी प्रकल्प हा ग्रामविकास, भूमि अभिलेख विभाग व भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त सहभागाने नगरपरिषद हद्दीत राबविण्याची मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत नगरपरिषद भूमापन न झालेल्या जमिनीचे भूमापन करून मिळकत पत्रिका स्वरूपात अभिलेख व नगरपरिषद क्षेत्रातील मिळकतींचे जीआयएस प्रणालीवर आधारित मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. नगरपरिषद हद्दीतील भूमापन प्रकल्प योजनेअंतर्गत तयार होणाऱ्या शासनाच्या मिळकतीचे संरक्षण होईल. मिळकतीचा नकाशा व सिमा निश्र्चित होवून मिळकतीचे नेमके क्षेत्र माहित होईल, अशा मिळकत पत्रिका तयार करण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांच्या नागरी हक्काचे संरक्षण होणार आहे. त्याचप्रमाणे नगरपरिषद हद्दीच्या क्षेत्रातील रस्ते तसेच नगरपरिषदेच्या मालकीच्या खुल्या जागा, नाला यांच्या सिमा निश्र्चित होईल. या योजनेमुळे मिळकत पत्रिका तयार झाल्याने घरावर कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध होईल. बाजारपेठेत मिळकतींना तरलता येवून नागरिकांची आर्थिक पत उंचावणार आहे. नगरपरिषद हद्दीतील कर आकारणी, बांधकाम परवानगी, अतिक्रमण निर्मुलन यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होवून सर्व कार्यपध्दती पारदर्शकपणे राबविली जाणार असून नागरिकांना अधिकार अभिलेख सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

प्रकल्पाचे फायदे : जमिनीची मिळकत पत्रिका, मालमत्ता पत्रक मिळेल, शासनाच्या मिळकतीचे संरक्षण होईल, मिळकतीचा नकाशा व सिमा निश्र्चिती, मिळकतीचे नेमके क्षेत्र कळणार, कार्यपध्दती पारदर्शकता, कर्ज सुविधेत सुलभता, नागरिकांची आर्थिक पत उंचावणार आदी फायदे या प्रकल्पाच्या माध्यमातून होईल. मान्यवरांच्या उपस्थि,तीत कार्यक्रम या कामाचा शुभारंभ आज मंगळवारी दि. १८ फेब्रुवारी रोजी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव, आमदार संजय गायकवाड, आ. धिरज लिंगाडे , जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, भुमि अभिलेख उपसंचालक डॉ लालसिंग मिसाळ, उप विभागीय अधिकारी शरद पाटील, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख नरेंद्र झांबरे, जिल्हा सह आयुक्त जी.एस. पेंटे यांच्या शुभ हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाउ सभागृह येथे सकाळी ११ वाजता होणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थि त राहण्याचे आवाहन भूमि अभिलेखचे उप अधीक्षक व्हि.ए.सवडतकर व गणेश पांडे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी केले आहे.

# गोवा महामार्ग लवकरच पूर्ण होईल

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई-गोवा महामार्ग पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल आणि आपल्या सर्वांचा मुंबईकडे जाणारा प्रवास सुखकर होईल, फ्लाइंग बोट सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, मुंबई ते सिंधुदुर्ग सेवा जलद होईल. या योजनेसाठी मी सहकार्य करेन, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते सिंधुदुर्ग येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी ते पुढे म्हणाले की, मी राजकीय कारकिर्द सुरू केली. त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यातून अनेक लोक सक्रिय होते.देशाच्या राजकारणात कोकणाचे योगदान मोठे आहे. कोकणचा एक इतिहास, संस्कृती विशेष आहे. मधू दंडवते, नाथ पै यांनी कोकणात विशेष कार्य केले. कोकणात दळणवळणाची मोठी अडचण होती. आप्पा त्यावेळी माझ्याकडे यायचे, कोकणात साकव महत्वाचे होते. त्यावेळी ३५० साकव मंजूर केले. अजूनही कोकणात जमिनीचा ताबा घेताना अडचणी येते. पण अप्पांनी अनेक पूल बांधले. देवगड हे हापूस आंब्याचे खरे माहेरघर आहे.अप्पांनी हा देवगड हापूस कसा मार्केट मध्ये जाईल, यासाठी प्रयत्न केले. - गावातील रस्ते, पूल, आंबा मार्केट यासाठी आप्पांचा मुख्य लक्ष होते. राजकारण म्हणजे केवळ सत्ताकारण नाही. माणूस हा जातीने मोठा नाही, आप्पांनी जातीभेद केला नाही. आज विज्ञानामुळे समाज बदलत चालला आहे. आप्पानी निःस्वार्थ पणे कार्य केले. तळागाळातील माणसाचे जीवन कसे सुखकर होईल हे आप्पांनी पाहिले. सामान्य जनतेबद्दल कळवळा असणारा सच्चा कार्यकर्ता म्हणजे आप्पासाहेब गोगटे आहेत. आज जे भाजपला जे वैभव मिळाले त्याचे खरे श्रेय आप्पा-काकांसारख्या अनेक हजारो कार्यकर्त्यांमुळे आहे. मी आपांच्या घरी गेलो की काकूंच्या हातचे जेवण जेवायचो. ज्यावेळी गरिबी होती, अन्न नव्हते त्यावेळी घरात आनंद होता, पण आता पैसा आला, घर आहे आनंद नाही.



आनंद या चित्रपट मी विसरू शकत नाही.मी दिवार-जंजीर पहिला पण आनंद विशेष होय.मुंबई-गोवा महामार्ग पावसाळ्यापूर्वी पूर्ण होईल आणि आपल्या सर्वांचा मुंबईकडे जाणारा प्रवास सुखकर होईल, फ्लाइंग बोट सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार, मुंबई ते सिंधुदुर्ग जलद होईल. या योजनेसाठी मी सहकार्य करेन, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

# पेनटाकळीवाशांना अखेर २७ वर्षानंतर मिळाला न्याय; गावठाण हद्दवाढ मागण्या पूर्ण

## केंद्रीयमंत्री जाधव, आमदार खरात यांच्या प्रयत्नाला यश; उपोषणाची सांगता





**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यातील पेनटाकळी प्रकल्पाच्या काठावर गेल्या बारा दिवसांपासून गावठाण हद्दवाढ करण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले ग्रामस्थांचे उपोषण गावठाण हद्दवाढ प्रकरणाचा निवाडा मान्य झाल्याने व केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, विद्यमान आ.खरात यांनी आश्र्वासन दिल्याने लोकप्रतिनिधीच्या उपस्थितीत उपोषणाची सांगता करण्यात आली. तब्बल २७ वर्षानंतर सदर प्रश्र्न मार्गी लागल्याने पेन टाकळी वाशीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

१९९८ सालापासून पेनटाकळी गावकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्र्न प्रलंबित होता. त्याचबरोबर गावठाण हद्दवाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत होता.सदर मागणीसाठी ६ फेब्रुवारीपासून पेनटाकळी येथील गावकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते. केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या सूचनेनुसार संजय रायमुलकर यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.तर,आमदार सिद्धार्थ खरात यांनी स्वतंत्र बैठक घेत सात हेक्टर ८२ आर जागेवर ३८२ भूखंड निर्माण करून त्या आराखड्याप्रमाणे गावकऱ्यांना भुखंड वाटप करण्याचा निर्णय घेतला. तसेच याबाबत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व आमदार सिद्धार्थ खरात यांच्या प्रयत्नाने पेनटाकळी गावठाण हद्दवाढ प्रकरणाचा निवाडा मान्य झाल्याने बाराव्या दिवशी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आ. सिद्धार्थ खरात ,संजय रायमुलकर यांच्या उपस्थितीत उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांनी उपोषणकर्त्यांना मार्गदर्शन केले. केंद्रीय मंत्री जाधव व आमदार खरात यांच्याहस्ते लिंबू पाणी घेऊन गावकऱ्यांनी उपोषणाची सांगता केली. यावेळी उपविभागीय अधिकारी रवींद्र जोगी, गट विकास अधिकारी संदीप मेटांगळे, ठाणेदार गजानन करेवाड, भूमी अभिलेखचे गवई, पाटबंधारे विभागाचे नागरे, नगर रचना विभागाचे सतीश वेरूळकर, ग्रामसेवक गजानन मवाळ आदी अधिकारी उपस्थित होते. सरपंच परमेश्वर वानखेडे, उपसरपंच पुंजाजी इंगळे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेश वाळूकर,,युवा सेनेचे जिल्हा प्रमुख ऋषिकेश जाधव, नीरज रायमुलकर, सह शिवसेना शिंदे पक्ष. व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

### ग्रामस्थांना लवकरच प्लॉटचे वाटप

पेनटाकळी येथे येथील ग्रामस्थांचा पुनर्वसनाचा प्रश्र्न अर्थात गावठाण हद्द वाढीचा प्रश्र्न २७ वर्षापासून रखडलेला होता. पेनटाकळी प्रकल्प झाला तेव्हापासून पेनटाकळी ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले त्यांना बसायला सुद्धा व्यवस्थित जागा मिळाली नाही. त्यावेळेस योगायोगाने मी पाटबंधारे विभागाचा राज्यमंत्री होतो. परंतु, काही कारणास्तव व्यक्तीचे सरकार गेले आणि पुन्हा पंधरा वर्षे काँग्रेसचे सरकार आले त्यामुळे या प्रश्र्नावर तोडगा निघाला नाही गेल्या दहा-बारा दिवसापासून पेनटाकळी येथील ग्रामस्थांनी उपोषण सुरू केले होते.ग्रामस्थांच्या सहकार्याने सदर प्रश्र्न हा निकाली काढण्यात आला आहे. ३८१ प्लॉट अधिकृत करण्यात आले आहेत. या प्लॉटची लवकरच ग्रामस्थांना वाटणे होईल पेनटाकळी प्रकल्प झाला तेव्हापासून या ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते. मात्र, आता सदर समस्या निकाली निघाल्याने असून लवकरच ग्रामस्थांना प्लॉट वाटप करून या ठिकाणी अद्यावत वस्ती उभारण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बोलताना दिली.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात कंत्राटी पध्दतीने भरती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बुलढाणा येथे माजी सैनिक, इतर प्रवर्गातून तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर कंत्राटी पध्दतीने सैनिकी मल्टी टास्कींग स्टाफ (अशासकीय) १ पद मेस्को व्दारे भरावयाचे आहे. सदर पदाकरीता इच्छुक सैन्य दलातील सेवानिवृत्त झालेल्या व इतर नागरीकांनी २४ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

अर्जदाराने वैयक्तिक अर्जासोबत आधार कार्ड, पॅन कार्ड, बॅक पासबुक, १० वी पास प्रमाणपत्र व संगणक प्रशिक्षण (MSCIT), टायपींग मराठी ३० व इंग्रजी ४० चे प्रमाणपत्र छायांकित प्रतीसह अर्जासोबत जोडावे. अर्जदार माजी सैनिक असल्यास पीपीओ, डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, संगणक प्रशिक्षण, टायपींग छायांकित प्रत अर्जासोबत सादर करावे.

## कळपिरा येथे शेतकऱ्यांना रब्बी पिक विमा पॉलिसीचे वितरण

**दैनिक आपला विदभ**

**■ गजानन जाधव**

**बेलगांव:** तालुक्यातील कळपिरा येथे मेरी पॉलिसी मेरे हाथ कार्यक्रमांतर्गत पिक विमा पॉलिसी चे वाटप करण्यात आले. प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०२-२५ मधील मेरी पॉलिसी मेरे हात या उपक्रमांतर्गत फेब्रुवारी महिन्यामध्ये जिल्ह्यात पिक विमा पावती शेतकऱ्यांना वितरित करण्यात येत आहे. पिक विमा कंपनीद्वारे मेहकर तालुक्यातही हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत रब्बी हंगामातील पिक विमा ज्या शेतकऱ्याने काढला होता. अशा शेतकऱ्यांना पीक विम्याची पावती दिली जात आहे.

यावेळी १४ फेब्रुवारी रोजी ग्रामपंचायत कार्यालय कळपविहीर येथे पिक विमातालुका समन्वयकांनी भेट देऊन हा उपक्रम राबविला. यावेळी उपस्थित कळपविहीर गावचे सरपंच प्रमोद तांगडे व ग्रामपंचायत कर्मचारी व गावातील प्रतिष्ठित शेतकरी आणि तालुका समन्वयक तुषार डोंगरे, आशिष पुरी, वसीम शाह, श्रीकृष्ण गवइ उपस्थित होते.




## सिंदखेडराजा येथील शिबीर कार्यालय रद्द

**बुलडाणा/प्रतिनिधी :** संत श्री गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त दि.२० फेब्रुवारी रोजी स्थानिक सुट्टी जाहीर झाली असल्यामुळे दि. २० फेब्रुवारी रोजी होणारे सिंदखेडराजा येथील शिबीर कार्यालय दि. २८ फेब्रुवारी रोजी घेण्यात येणार आहे. वाहनधारक, वाहन वितरक, मोटार ड्रायव्हींग स्कुल संचालक तसेच नागरिकांनी दि. २८ फेब्रुवारी शिबीर कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकार यांनी केले आहे.

## संजय राऊत यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे; प्रतापराव जाधव यांची राऊत यांच्यावर टीका



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात दररोज शिवसेनेमध्ये प्रवेश होतोय. बुलढाण्यात सुद्धा उबाठा मधून आज अनेकांनी शिवसेना शिंदे घटक प्रवेश केला. त्यामुळे संजय राऊत यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. अशी टीका शिवसेनेचे खासदार केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना उबाठा शिवसेना व संजय राऊत यांच्यावर केली. यावेळी ते पुढे म्हणाले की, आपली लोक थांबवण्या ऐवजी दुसऱ्याचे काय होईल, हे म्हणणं योग्य नाही, त्यांनी त्यांचा पक्ष सांभाळावा, ज्या लोकांनी मला मतदान रुपी आशीर्वाद दिले त्यांच्या समस्यांसाठी मी बांधिल आहे.मी कोणावर टीका करत नाही. मात्र, मागील सहा महिन्यात आरोग्य विभाग आणि आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून किती काम झाले हे पहावे त्यांनी जाऊन विचारपूस करावी, की काय काम झाले ते सोयाबीन चे ४७०० भाव झाले की, अरबी समुद्रात उडी मारायची आणि ३८०० भाव झाले की घरात बसून राहायचे,कोणाला शेती कळते हे समजून घेतले पाहिजे. जीबीएस चा धोका, आणि सर्वदूर रुग्ण आढळत आहेत. आमचे मंत्रालय सज्ज आहे आणि राज्याचे आरोग्य खाते सुद्धा यावर प्रतिबंध करणेसाठी सज्ज आहे.जर काही धोका असेल तर डॉक्टर यांची बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेऊ. सोयाबीन खरेदी केंद्र आणि एफआयसी केंद्र बंद झाले. आपल्या जिल्हा सोयाबीन खरेदी केंद्र मोठ्या प्रमाणात रघडली होती, त्याठिकाणी मोठी खरेदी झालीय.अद्याप कोणत्याही शेतकऱ्यांच्या आमच्या पर्यंत तक्रारी नाहीत.एफ आयसी चे केंद्र जर बंद झाले असतील आणि कुण्या शेतकऱ्यांच्या कापूस घरात पडून असेल तर केंद्र चालू कारणासाठी कृषिमंत्रीकडे मागणी करू, शेतकऱ्यांचे हित जोपासणारे आमचे सरकार असून शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही अशी ग्वाही केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली.

# शिवजयंती दिनी जिल्ह्यात ड्राय डे जाहीर

- जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी
- शिवजयंती उत्सवाच्या पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** यंदा जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येणार आहे. या उत्सव कालावधीत बुलढाणा जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था तसेच सार्वजनिक शांतता आबाधित राहावी यासाठी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी बुधवारी दि. १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील सर्व देशी-विदेशी मद्य विक्री दुकाने, परवाना कक्ष व बीअर बार विक्री दुकाने बंद अर्थात कोरडा दिवस (ड्राय डे) ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था व पूर्वतयारीबाबत आज जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक जिजाउ सभागृहात घेतली.




या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी, उपविभागीय अधिकारी शरद पाटील आदी विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

या बैठकीत छत्रपती श्री शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीन आयोजित कार्यक्रमांबाबत आढावा जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी घेतला. बुलढाणा जिल्ह्यात शिवजयंतीचा एकच भव्य कार्यक्रम साजरा व्हावा. शिव छत्रपतींचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व शांततेत पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने प्रशासन सज्ज झाले आहे. शिवजयंतीच्या दिवशी संपूर्ण जिल्ह्यात मद्य विक्री बंद अर्थात ड्राय डे जाहीर करण्यात आला आहे. त्याचे तंतोतंत पालन करावे व या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुध्द कडक कारवाई करावी. तसेच कर्कश आवाजांचे डिजे, डॉल्बी मर्यादित आवाजात वाजवण्यात येईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिले. धार्मिक भावना दुखाणारे कृत्य करु नका जिल्ह्यात शिव जयंती मोठ्या उत्साहात साजरी होते. या दिवशी आपल्या कृत्यातून कोणत्याही धार्मिक, सामाजिक भावना दुखावणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सुचनांचे पालन करुन सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे यांनी नागरिकांना केले आहे.

यावेळी वरिष्ठ पत्रकार राजेंद्र काळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमांचे माहिती या बैठकीत दिली.